कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 03 /२०२६ दि. 0९/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतुक उप विभागाचे हद्दीत दिनांक ०९/०१/२०२६ रोजी महानगरपालिका निवडणुक २०२५.२६ अनुषंगाने मा. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची जूनी जनता सहकारी बॅक, कोळशेवाडी कल्याण पूर्व या ठिकाणी प्रचारसभा होणार असून, त्यांचे सोबत इतर व्ही.आय.पी. देखील उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कोळशेवाडी स्टेशन रोड, भैरव टी स्टॉल येथून म्हसोबा चौक, शिवाजी कॉलनी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भैरव टी स्टॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व प्रकारची वाहने काटेमानीवली ब्रिज खालून उजवीकडे वळण घेवून व गणेश चौक येथुन डावीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** तिसगाव ते सिध्दार्थ नगर रोडवरील म्हसोबा चौक येथून जुनी जनता सहकारी बॅक, भैरव टी स्टॉल व शिवाजी कॉलनी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **म्हसोबा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	तिसगाव सदरची वाहने सिध्दार्थ नगर येथून उजवीकडे वळण घेवून व तिसगाव नाका येथून डावीकडे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वा. पासुन ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/–सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली न्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.